# हृदयाने जाणणे

प्रिय मित्रांनो,

असे म्हटले जाते की शिवाजी महाराजांचे गुरू श्री रामदास स्वामी हे रामायणाचे वर्णन इतक्या दिव्यपणे करत की ते ऐकण्यासाठी प्रत्यक्ष हनुमान वेश बदलून येत असे. अशाच एका सत्रामध्ये रामदास सीतेला बंदी बनवून पळवून नेल्यानंतर, पहिल्यांदाच जेव्हा ती हनुमानाच्या दृष्टीस पडली त्या क्षणाचे वर्णन करीत होते. त्याला ती रावणाच्या वाटिकेत शुभ्र फुलांच्या ताटव्यामध्ये बसलेली दिसली.

ही गोष्ट ऐकल्यावर हनुमान झटक्यात भानावर आला व त्याने घेतलेले सोंग सोडून म्हणाला, “महाराज मी आपल्या कथा अतिशय आनंदाने ऐकतो कारण माझ्या प्रभूंच्या गोष्टींशिवाय इतर कोणतीही गोष्ट मला अधिक प्रिय नाही. परंतु मला हे सांगताना दुःख होत आहे की यातील एक तपशील चुकीचा आहे. रावणाच्या वाटिकेतील फुले तुम्ही सांगितल्याप्रमाणे पांढरी नव्हती तर लाल होती. मला हे वास्तव माहीत आहे कारण मी प्रत्यक्ष तिथे होतो व माझ्या डोळ्यांनी मी ते पाहिले आहे.”

रामदासांच्या कथांमधील सौंदर्य हे होते की त्यांना दिव्यदृष्टी प्राप्त होती बरेच लोक करतात तसे ते केवळ रामायणाच्या कथा सांगत नव्हते तर स्वतः त्या प्रत्यक्ष पाहत होते, जसे भगवद्गीतेमध्ये संजय तो जे पाहत होता त्याचे वर्णन करीत होता. अशा आकलनशक्तीमुळे येणाऱ्या आत्मविश्वासाने रामदासांनी हनुमानाला समजावले की कदाचित त्याला हा तपशील नीट आठवत नसेल, कारण फुले नक्कीच पांढरी होती.

“तर मग आपण हे श्रीरामांनाच विचारू” असे हनुमान म्हणाला व ते दोघे रामाकडे गेले.

दोघांचेही म्हणणे ऐकल्यावर राम म्हणाले, “मला क्षमा करा पण मी तुमची ही समस्या सोडवू शकत नाही, कारण मी त्यावेळी तिथे हजर नव्हतो.”

ते रामाकडून निघाले व हनुमान म्हणाला, “आपण सीतामातेकडे जाऊ. ती खात्री देऊ शकेल की फुले लाल होती.”

त्यांनी संपूर्ण प्रसंग सीतेला सांगितला. त्यानंतर सीता म्हणाली, “रामदास सत्य सांगत आहेत. फुले शुभ्र पांढरी होती. ती लाल अजिबातच नव्हती.”

हनुमानाला आश्चर्य वाटले. “हे कसे शक्य आहे? मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे की फुले लाल होती.”

“होय, तुला ती लाल दिसली.” सीतेने त्याला समजावले. “परंतु त्यावेळी तुझी दृष्टी रागाने लाल झाली होती कारण तुला नुकतेच समजले होते की मी रावणाच्या बंदिवासात आहे. त्यामुळेच तुला पांढरी फुले लाल दिसली.”

हनुमान इतका चिडलेला होता की त्याच्या रागाने त्याची दृष्टी बदलली. पांढरी शुभ्र फुलेही त्याला अग्निसारखी भासली. तो क्षणभर मायेच्या स्थितीमध्ये अडकला होता व त्याला वास्तवाचे आकलन अवास्तवासारखे झाले. चुकीच्या विचारांमुळे चुकीचे आकलन होण्याची ती स्थिती होती.

याचप्रमाणे, समजा की एखादा भित्रा प्रवासी रात्री एकटाच चालत चालला आहे. त्याला एक छोटासा काजवा अंधारात चमकताना दिसतो व तो त्याला भूत समजतो. पुढे त्याला एक दोर दिसतो, ज्याला तो साप समजतो. आणखी एक माणूस रात्री उशिरा त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी फोनवर बोलत असतो आणि त्याची बायको निष्कर्ष काढते की तो विश्वासघात करीत आहे. या दोन्ही प्रसंगांमध्ये परिस्थितीचे वास्तव बघितले गेले नाही, कारण तिचे आकलन अयोग्य विचारांची चाळण लावून केलेले होते. दोन्ही प्रसंग अज्ञाताने सुरू होतात. दोरखंडाची ओळख अज्ञात असणे, अज्ञात माणूस फोनवर असणे. आपल्याला प्रत्येक क्षणी अज्ञाताचा सामना करावा लागतो, परंतु त्यामुळे भ्रम निर्माण होण्याचे काही कारण नाही.

*वास्तवाला त्याच्या वास्तव रूपात न पाहता येणे, अयोग्य विचार आणि आणि गैरसमज या सर्वांच्या मागचे कारण आहे आपल्या अंतरंगात आपण बाळगत असलेले ओझे - आपले संस्कार.*

बाबूजी महाराजांनी या मायेचे कारण ओळखले होते. वास्तवाला त्याच्या वास्तव रूपात न पाहता येणे, अयोग्य विचार आणि आणि गैरसमज या सर्वांच्या मागचे कारण आहे आपल्या अंतरंगात आपण बाळगत असलेले ओझे - आपले संस्कार.

संस्कार म्हणजे भावनिक प्रभाव टाकणाऱ्या अनुभवांचे ठसे जे आपल्या चेतनेवर कोरले जातात आणि आपल्या अवचेतनेत राहून आपल्या जीवनावर सुप्त प्रभाव टाकतात, ज्यामुळे आपण आपले वर्तमान वास्तव भूतकाळातील अनुभवांचा चष्मा लावून पाहतो. आपल्या जुन्या भावना आणि साचेबद्ध विचार आपल्या वर्तमानातील वास्तविकतेवर अधोरोपित (सुपरइम्पोज) होतात व परिणामी ती पूर्वग्रहदूषित बनते. हे भावनिक आठवणींचे भांडार आता आपल्या घटनांच्या बाबतीतील निष्कर्षांना प्रभावित करते. हे असे असते जणूकाही आपण जगाकडे रंगीत चष्मे लावून पाहत आहोत.

*हे भावनिक आठवणींचे भांडार आता आपल्या घटनांच्या बाबतीतील निष्कर्षांना प्रभावित करते. हे असे असते जणूकाही आपण जगाकडे रंगीत चष्मे लावून पाहत आहोत.*

मला 'ऑझचा जादूगार' या चित्रपटाची आठवण होते ज्यात ऑझ या शहरातील सर्व काही हिरवेकंच आहे असे मानले जाते, परंतु तो केवळ एक भ्रम असतो. ऑझ हे इतर शहरांसारखेच एक शहर असते. हा हिरवेपणाचा भ्रम तेथील प्रत्येक रहिवाशाला हिरव्या काचांचा चष्मा देऊन टिकवून ठेवलेला असतो, जो त्यांनी सतत डोळ्यांवर ठेवायचा असतो. हा रंगीत चष्मा तेथील रहिवाशांमध्ये ते शहर हिरवे असल्याचा भास निर्माण करतो.

ही एक काल्पनिक कथा होती परंतु आपली वास्तव जीवनातील दृष्टी तितकीच विपर्यस्त असते. आपण आपल्या जीवनात अनुभवत असलेले पूर्वग्रह त्यापेक्षा फारच वाईट असतात, कारण ऑझच्या रहिवाशांनी एकाच रंगाचा चष्मा घातलेला असतो, परंतु आपल्याकडे अनेक भिंगे असतात जी आपल्या आकलनाला झाकोळून टाकतात. चष्मा सहजपणे काढून ठेवता येतो, परंतु ही भिंगे इतकी खोल रुतलेली असतात की आत्मा आपल्या चेतनेबरोबरच त्यांनाही एका जन्मातून दुसऱ्या जन्मात वाहून नेत असतो. आपण घालत असलेला चष्मा एकाच रंगाचा नसतो तर त्या भिंगामध्ये अनेक छटा मिसळलेल्या असतात, ज्यामुळे तो जवळपास अपारदर्शक बनलेला असतो आणि त्यातही ही भिंगे कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक उद्भवतात. जेव्हा वास्तविकतेच्या या प्रकाशाला आपल्या चेतनेमध्ये प्रवेश करण्यापासून रोखले जाते, तेव्हा आपण अंधारात जगत असतो, एक प्रकारच्या नरकात.

संस्कार आपल्या आकलनाला पूर्वग्रहदूषित बनवतात आणि आपण गोष्टींना एक तर चांगले किंवा वाईट ठरवतो. काही गोष्टींना सुंदर तर काहींना कुरूप ठरवतो. काहींना पवित्र, काहींना अपवित्र ठरवतो. आपल्या हातून ही वस्तुस्थिती निसटते की पावित्र्य सर्वत्र आहे, सौंदर्य सर्वत्र आहे. निवाडा पाहणाऱ्याच्या दृष्टीमध्ये

*खरी नि:पक्षपाती दृष्टी गोष्टींना त्या जशा आहेत तसेच पाहते, त्यात काहीही कमी-अधिक न करता भावनिक पातळीवर कोणत्याही प्रकारचा निवाडा किंवा निष्कर्ष न काढता. जेव्हा सर्व भिंगे निघून जातात तेव्हा दृष्टी उदयास येते आणि शास्त्रांमध्ये या विशुद्ध दृष्टीला दर्शन असे म्हणतात.*

असतो. आपण तो वास्तविकतेवर लादतो. खरी नि:पक्षपाती दृष्टी गोष्टींना त्या जशा आहेत तसेच पाहते, त्यात काहीही कमी-अधिक न करता भावनिक पातळीवर कोणत्याही प्रकारचा निवाडा किंवा निष्कर्ष न काढता. जेव्हा सर्व भिंगे निघून जातात तेव्हा दृष्टी उदयास येते आणि शास्त्रांमध्ये या विशुद्ध दृष्टीला दर्शन असे म्हणतात.

बहुतेक लोक दर्शनाला मर्यादित अर्थाने घेतात, म्हणजे एखाद्या महात्म्याची एक झलक. श्रीकृष्णांच्या जीवनकाळात अनेकांना त्यांची झलक दिसली परंतु अगदी एखाद्यालाच ते कोण होते हे दिसले. मग खऱ्या अर्थाने त्यांचे दर्शन कुणाला प्राप्त झाले? यावरून मला बाबूजींचे एक वाक्य आठवते, “बरेच लोक मला पाहायला येतात परंतु कोणीच खऱ्या अर्थाने मला पाहत नाही.”

बऱ्याच लोकांनी श्रीकृष्णाचा तिरस्कार केला. फारच थोड्या लोकांनी त्याच्यावर प्रेम केले. दुर्योधनाने त्याचा अपमान केला. त्याला केवळ एक जादूगार म्हटले. अर्जुन त्याची प्रशंसा करायचा, परंतु त्यानेही त्याच्याकडे मर्यादित दृष्टीने पाहिले - एक मित्र म्हणून. अगदी राधेलाही तिच्या श्रीकृष्णावरील असीम प्रेम व भक्तीमध्ये त्याच्या संपूर्ण विश्वाचा स्वामी या महानतेचे आकलन झाले नाही. त्याला पाहणाऱ्या प्रत्येकाचा एक वेगळा दृष्टिकोन होता. संपूर्ण सत्य कोणालाच दिसले नाही.

याचे कारण प्रत्येक व्यक्ती ही अद्वितीय असते. जगात अब्जावधी लोक आहेत. कल्पना करा की आपण एकत्रितपणे किती ठसे वाहत असतो. या पृथ्वीवरील आपल्या सामायिक क्षणामध्ये आपण किती पूर्वग्रह मिसळत असतो आणि किती वैयक्तिक दृष्टिकोन असतात. याचा सर्वसाधारण परिणाम म्हणजे मतभेद आणि भांडणे.

आपण कायमच असे नव्हतो. मुळात प्रत्येक चेतना ही एकसारखीच होती. सर्वांकडेच वास्तविकतेविषयीची विशुद्ध दृष्टी होती. चुकीच्या विचारांमुळे भेद निर्माण झाले व आपण आपली स्वतःची छोटी-छोटी विश्वे निर्माण करण्यास सुरुवात केली. बाबूजी आपल्या या विश्वांना बेटांची उपमा देतात - अशी बेटे जी एकमेकांपासून दूर वाहत जातात, ऐक्यापासून दूर, वैयक्तिकपणा, वेगळेपणा व अहंकारयुक्त अस्तित्वाच्या दिशेने.

अहंकार हा स्वभावत:च आत्मकेंद्रित असतो आणि स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपडत असतो. अहंकाराला सर्वात जास्त भीती त्याची ओळख नष्ट होण्याची असते. त्याच्या दृष्टिकोनातून अहंकाराच्या मृत्यूपेक्षा शारीरिक मृत्यूही श्रेयस्कर असतो. स्वतःचे अस्तित्व सातत्याने टिकवण्यात मग्न असलेल्या अहंकाराला सतत स्वत:ला पाहायचे असते, जणूकाही तो आरशात बघत आहे, याची खात्री करून घेण्यासाठी की तो अजूनही अस्तित्वात आहे.

जर अहंकाराला स्वतःचे असे काही स्वरूप नसेल तर तो स्वतःला कसा पाहू शकतो? तर याचे उत्तर आहे की तो वैयक्तिक ज्ञात्याच्या बाह्य व इंद्रियगोचर अशा जाणवू शकणाऱ्या वस्तूंवरून स्वतःची ओळख ठरवतो. एखाद्या बाह्य वस्तूकडे बोट दाखवून तो जाहीर करतो “तो मी आहे,” आणि त्याने त्याचे समाधान होते. अशा प्रकारे तो स्वतःची ओळख मनाशी, शरीराशी किंवा अगदी मानवी संरचनेच्या बाहेरील गोष्टींशीसुद्धा जोडू शकतो, जसे संस्कृती, भाषा, आवड, मालकीच्या वस्तू, इत्यादी.

एका पत्राला उत्तर देताना बाबूजी महाराजांनी लिहिले, “तुम्हाला संतांचे दर्शन घ्यावेसे वाटते ही चांगली गोष्ट आहे. पण त्याहीपेक्षा चांगली गोष्ट तुम्हाला स्वतःचे दर्शन होणे ही आहे.” स्वतःच्या वास्तविक ‘स्व’ चे दर्शन होण्यासाठी आपल्या अहंकाराने गोळा केलेली खोटी व्यक्तित्वे किंवा ओळखी गळून पडाव्या लागतील. परंतु अहंकार या खोट्या ओळखींना अगदी घट्टपणे चिकटून असतो. त्यांना धोका उद्भवताच तो अतिशय आक्रमकपणे हल्ला करू शकतो. तुम्ही स्वतःलाच विचारा की ज्या गोष्टीला तुम्ही स्वतःचा भाग समजता त्यावर टीका केली गेली तर तुम्हाला कसे वाटते - तुमचा धर्म, तुमचे राष्ट्र, तुमचा समाज, तुमचे कुटुंब वगैरे. त्या भावनेची तीव्रता तुम्हाला अहंकाराच्या व्यक्तित्वांच्या तीव्रतेची कल्पना देईल - खऱ्या व्यक्तिमत्त्वाचे मुखवटे.

ठाम अहंकार हे ऐक्याचा नाश करणारे असतात. समूहामध्ये काम करत असताना इतरांना गोष्टी तुमच्यापेक्षा वेगळ्या प्रकारे करायच्या असू शकतात. तुम्ही जर तुमच्या स्वतःच्या कल्पनांवरून स्वतःची ओळख ठरवत असाल तर इतरांकडून आलेल्या विधायक सूचनाही तुम्हाला वैयक्तिक धमक्यांसारख्या वाटू शकतील. कल्पना करा, जर समूहातील प्रत्येकाने कामाची “माझेच खरे” हीच पद्धत निवडली तर! त्याचा परिणाम काय होईल याची कल्पना करा! दृष्टिकोनातील फरक पोषक असतात, जेव्हा आपण लवचिक राहून अहंकारांची लढाई टाळतो.

कामाची अहंकारयुक्त पद्धत आपल्याला दिव्य ऊर्जेचे वाहक बनवण्याच्या गुरुदेवांच्या कामामध्ये बाधा आणते. जर दिव्य ऊर्जेच्या प्रवाहाला आपल्या आतच प्रतिकाराला सामोरे जावे लागले तर घर्षण निर्माण होते. ध्यानादरम्यान जाणवणारे ‘झटके’ यासारख्या गोष्टी संरचनेतील प्रतिकाराच्या द्योतक असतात.

*स्वत:च्या वास्तविक ‘स्व’ चे दर्शन होण्यासाठी*
*आपल्या अहंकाराने गोळा केलेली खोटी व्यक्तित्वे किंवा*
*ओळखी गळून पडाव्या लागतील.*


अहंकार आणि संस्कार हे भागीदार आहेत. जेव्हा आपण भावनिक प्रतिक्रिया देतो तेव्हा संस्कार निर्माण होतात. अहंकार हा आपल्यामधील प्रतिक्रिया देणारा घटक आहे जो संस्कारांच्या निर्मितीला चालना देतो. अहंकार प्रतिक्रिया का देतो? अहंकाराच्या एखाद्या ओळखीला बढावा दिला जातो किंवा धोका निर्माण होतो तेव्हा अहंकार प्रतिक्रिया व्यक्त करतो. ही प्रतिक्रिया आवड किंवा नावड या स्वरूपात व्यक्त होते. या प्रतिक्रियेदरम्यान निर्माण होणारी सकारात्मक किंवा नकारात्मक भावना मग ठशाचे स्वरूप धारण करते.

त्याला पूरक म्हणून संस्कार त्या गोष्टी ठरवतो, ज्यावरुन अहंकार स्वतःला ओळखतो. म्हणजे अहंकार आणि संस्कार हे मायेचे सहनिर्माते आहेत, जी आपल्या आकलनाला झाकोळून, आपल्याला वास्तविकतेचे विपर्यस्त दर्शन घडवते.

वैयक्तिक नियतीचे वृक्ष हे संस्कारांच्या बीजांपासून निर्माण होतात जी अहंकाराच्या मातीमध्ये रुजवली जातात. आपले संस्कार आपल्या हृदयातील हेतू निर्माण करतात, जे साध्य करण्यासाठी मन काम करते. मनाच्या या क्रिया व प्रवृत्ती यांना 'वृत्ती' म्हणतात आणि याउलट आपल्या वृत्तींपासून आपल्या 'प्रवृत्ती' तयार होतात. वृत्ती व प्रवृत्ती एकत्रितपणे आपल्या प्रकृतीला (स्वभावाला) तीन गुणांनी रंगवतात - सत्व राजस आणि तमस.

आपल्या स्वभावाच्या गुणधर्मानुसार आपण काही क्रियांची पुनरावृत्ती करत राहतो. खाण्याची आवड असलेली व्यक्ती सतत उपहारगृहांना भेट देत राहते, लाटांवर स्वार व्हायला आवडणारी व्यक्ती सतत लाटांचा पाठलाग करत राहते, चित्रपटांची आवड असणारी व्यक्ती सतत सिनेमागृहात जाते. अशा क्रिया विशिष्ट प्रकारचे संस्कार गोळा करण्यास मदत करतात जे प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावानुसार अद्वितीय असतात. जन्मामागून जन्म अविरतपणे चालणाऱ्या या क्रिया आणि संस्कारांचा संचय आपल्या स्वभावाला अधिकच पक्के बनवतात. यालाच आपण प्रारब्ध म्हणून ओळखतो.

*वैयक्तिक नियतीचे वृक्ष हे संस्कारांच्या बीजापासून निर्माण होतात जी अहंकाराच्या मातीमध्ये रुजवली जातात. आपले संस्कार आपल्या हृदयातील हेतू निर्माण करतात, जे साध्य करण्यासाठी मन काम करते. मनाच्या या क्रिया व प्रवृत्ती यांना वृत्ती म्हणतात आणि याउलट आपल्या वृत्तींपासून आपल्या प्रवृत्ती तयार होतात. वृत्ती व प्रवृत्ती एकत्रितपणे आपल्या प्रकृतीला (स्वभावाला) तीन गुणांनी रंगवतात - सत्व राजस आणि तमस.*




आपणच आपल्या वैयक्तिक प्रारब्धाचे निर्माते आहोत. परंतु एक दैवी प्रारब्धही असते - असे प्रारब्ध जे तेव्हाच घटित होऊ शकते, जेव्हा आपण वैयक्तिकरित्या निर्माण केलेली विश्वे नाहीशी केलेली असतील आणि स्वतःचा वैयक्तिक प्रलय घडवून आणलेला असेल.

हेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महान ऋषी पतंजलींनी योगाचा मार्ग दाखवला, ज्यायोगे आपण आपल्या वृत्तींचा निषेध करू शकतो, ज्यांनी एरवी अपरिहार्यपणे आपल्या प्रारब्धाची रचना केली असती व आपल्याला मायेच्या चक्रात अडकवून ठेवले असते. हे तेच उद्दिष्ट आहे ज्यासाठी पूज्य बाबूजी महाराजांनी आपल्या वृत्तींना पोषक ठरणारे संस्कार काढून टाकण्यासाठी काही पद्धती निर्माण केल्या. चित्त वृत्ती निरोध एका अर्थाने योगिक अवस्था आहे. आपल्या वृत्तींना पोसत राहिल्यास आपली कधीच मुक्तता होणार नाही. म्हणूनच त्याला अ-योग म्हणतात.

दुर्दैवाने अहंकाराचा कल स्वतःच्या निर्मितीचा बचाव करण्याकडे आणि वृत्ती, प्रवृत्ती, प्रकृती आणि प्रारब्धावरून स्वतःची ओळख ठरवण्याकडे असतो. त्यामुळे परिवर्तन अवघड बनते. चारीजी म्हणत असत की मूर्ख माणसाला त्याच्या चुका लक्षात आल्याच तर त्या घटना घडून गेल्यानंतर येतात. बुद्धिमान माणसाला त्याच्या चुका तो त्या करीत असतानाच लक्षात येतात आणि सुज्ञ माणसाला त्याच्या चुका आधीच दिसून येतात व तो त्या करणे टाळतो.

अशा माणसाला कुठल्या श्रेणीत टाकायचे, ज्याला त्याच्या चुका दिसतात पण हटवादीपणे ते आग्रह धरतात की त्यांच्याच कृती बरोबर आहेत? अशा व्यक्तीचे रूपांतरण कसे होईल? ती स्वतःचा वैयक्तिक प्रलय कसा घडवून आणू शकेल, जर ती स्वतःच्या रचना निर्माण करण्यात व्यस्त असेल. हे म्हणजे तांब्याचे रूपांतर सोन्यात होण्यासारखे आहे. हे कधीतरी शक्य आहे का? यावरून हे स्पष्ट होते की आपण स्वतःला बदलण्यात इतके अपयशी का ठरतो? यावरून हेही स्पष्ट होते की बाबूजींच्या तेवीस वर्तुळांच्या चित्रामध्ये अहंकाराची वर्तुळे मायेच्या वर्तुळांना आधार का देतात.

सहज मार्ग आपल्याला एक आंतरिक प्रशिक्षण देऊ करते, ज्याने आपण आपल्या जीवनशैलीवर प्रभुत्व प्राप्त करून आपली उदात्त कार्ये, संस्कारांची निर्मिती न करता, पार पाडू शकतो. संस्कारांचे ओझे काढून टाकणे सोपे आहे. दिवसभरातील संस्कारांचा संग्रह आपल्या संध्याकाळच्या शुद्धीकरणाद्वारे काढला जातो. या जन्मातील भूतकाळातील ठसे प्रशिक्षकांबरोबर घेतलेल्या वैयक्तिक सिटिंगमध्ये काढले जातात. पूर्वजन्मांमधील संस्कार भंडाऱ्यादरम्यान, सामूहिक सत्संगात, गुरुदेवांच्या शारीरिक उपस्थितीत काढले जातात आणि जर अभ्यासी समर्पित असेल आणि लयावस्थेप्रत पोहोचला असेल तर कोणत्याही वेळी.

संस्कारांच्या निर्मितीला प्रतिबंध करणे आव्हानात्मक आहे. या जगात जीवन जगत असताना ठसे टाळणे हे कोळशाच्या खाणीत अंगाला काळे लागू न देण्यासारखे किंवा वादळी पावसात चालत असताना ओले न होण्यासारखे आहे. आपण पावसाला टाळू शकत नाही, परंतु रेनकोट घालून स्वत:ला ओले होण्यापासून वाचवू शकतो. मनाच्या व हृदयाच्या बाबतीत असा रेनकोट कोणता असू शकतो, जेणेकरून ते भावनिक उद्रेकादरम्यान अप्रभावित राहू शकतील? तो म्हणजे सतत स्मरणाचे संरक्षक कवच, जे ईश्वराच्या प्रेमाने चिंब झालेले आहे.

सतत स्मरण ही एक अद्भुत चाळण आहे जी ठशांना त्यांनी आपल्या चेतनेला डागाळण्याआधीच गाळून टाकते. त्याच्यावरील विनम्रतेच्या छताने सतत स्मरण अहंकाराला गाळून टाकून आपल्याला पक्षपातीपणापासून सुटका मिळवून देते. त्यामुळे दिव्य गंतव्यस्थान स्पष्टपणे नजरेसमोर राहते. सांसारिक आणि भ्रामक गोष्टीसुद्धा दिव्य आणि अद्वितीय बनतात जेव्हा आपले आकलन हृदयपूर्वक गुरुदेवांच्या प्रेमामध्ये बुडून गेलेले असते. जर ईश्वर दिव्य असेल तर त्याची रचना दिव्यच असणार. कारण स्रोत आणि त्यातून बाहेर येणारी गोष्ट एकच असते. प्रत्येक गोष्ट दिव्य बनते.

प्रेम व आदरासहित

*कमलेश*

## पूज्य श्री बाबूजी महाराजांच्या

123 व्या जन्मोत्सवानिमित्त

29 व 30 एप्रिल, 1 मे 2022

heartfulness™
advancing in love